लोकमत



**नववर्षाच्या अशाही शुभेच्छा...** शिवाजी विद्यापीठातील दीक्षांत हॉल येथे गेली चार वर्षे सुरु असलेल्या योगासन व प्राणायाम वर्गातील ५० वर योगसाधकांनी गुढीपाडवा नववर्षानिमित्त विद्यापीठ कॅम्पसमध्ये शनिवारी सकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्यांना गंधाचा टिळा लावून नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी योगगुरु दत्ता पाटील, योगशिक्षक सूरज पाटील व योगसाधक उपस्थित होते.

-8 APR 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दूरशिक्षण'चे आता होणार ऑनलाईन 'लेक्चर'

## २०१९-२० शैक्षणिक पासून ऑडीओ, व्हिडीओ सीडी व नोटस् विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध : विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातील १६ विषयांचा अभ्यासक्रम यंदा म्हणजे २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून ई-कन्टेन्टमध्ये ऑनलाईन व सीडीमध्ये दिला जाणार आहे. या सीडी दूरशिक्षण केंद्रातील विद्यार्थी सुविधा केंद्रांतर्गत दिल्या जाणार आहेत. या विषयांच्या पुस्तकांची सॉफ्टकॉपी, ऑडीओ-व्हिडीओ क्लिप, पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन **www.unishivaji.ac.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिले जाणार आहे. दूरशिक्षणच्या विद्यार्थ्यांना जगभर कोठेही मोबाईलवर दूरशिक्षणच्या विषयांचा अभ्यास करता येणार आहे. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन विद्यापीठाने ही सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या वतीने १३ अभ्यासक्रम चालवले जातात. यामध्ये बी. ए., बी. कॉम., बी.एस्सी., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. आदी अभ्यासक्रम सुरू आहेत. दूरशिक्षण केंद्रातील विषयांच्या पुस्तिका आहेत. पण विद्यार्थ्यांना एखादा विषय अवघड वाटतो, त्यातील काही गोष्टी समजत नाहीत, असे विषय प्राध्यापक ऑडीओ आणि व्हिडीओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार. सुरूवातीला या सीडीज विद्यार्थी सुविधा केंद्रात मिळतील व हळूहळू त्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. स्क्रिनवर पॉवरपाईंट प्रेझेंटेशन, कार्टुन्स, ॲनिमेशनच्या माध्यमातून ऑनलाईन अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. इलेक्ट्रॉनिक कन्टेन्टमध्ये विद्यार्थ्यांना एखादा आराखडा (ग्राफ) स्क्रिनवर पाहून समजून घेता येणार आहे. सध्या या अत्याधुनिक नोटसचे रेकॉर्डींग विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागातील स्टुडीओमध्ये सुरू आहे. प्राध्यापक आपआपल्या विषयाच्या नोटस तयार करून व्हिडीओ किंवा ऑडीओ लेक्चर तयार करण्यात व्यस्त आहेत.

डिजिटल युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून ज्या १३ विषयाच्या नोटस ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या जातील. परिणामी नोटस् मिळाल्या नाहीत अशी विद्यार्थ्यांची वारंवार तक्रार होत होती. या तक्रारी बाबतीत, विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा आणि खर्चही वाचेल आणि फावल्या वेळेत संबंधीत विषयांचा अभ्यास करणे सहज शक्य होणार आहे.



### विद्यार्थी हिताचा निर्णय

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून १३ विषयांच्या नोटस आडीओ आणि व्हिडीओ, ॲनिमेशन पद्धतीने उपलब्ध होणार आहे. त्यामुळे काम करणाऱ्या गृहीणी, कामगार यांना फावल्या वेळात मोबाईलवर अभ्यास करता यावा म्हणून हा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजवणी केली जाईल.

**-डॉ. एम. ए. अनुस (दूरशिक्षण केंद्राचे संचालक)**

### नवीन डिप्लोमा अभ्यासक्रम सुरु होणार

इव्हेंट मॅनेजमेंट, पर्सनॅलिटी अ‍ॅन्ड इंटरव्ह्यूव टेक्नीक स्कील, प्रेझेंटेशन स्किल, ट्रॅव्हल अ‍ॅन्ड टुरिझम स्कील, ई-गव्हर्नर स्किल, ट्रेनर ट्रेनिंग स्कील इन्फोसेस, हॉस्पिटॅलिटी स्किल, फायनान्सीयल मॅनेजमेंट, इशु कल्चर डेव्हलपमेंट, ई-कॉमर्स स्किल, हॉस्पीटल ॲडमिनिस्ट्रेशन, पी. जी. डीप्लोमा इन इन्व्हायरमेंट सायन्स, हेल्थ अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट, व्हॅल्यू एज्युकेशन अ‍ॅन्ड इथिक्स या बरोबर लर्निंग मॅनेजमेंट हे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. अधिकार मंडळाची मान्यता घेवून कालावधी ठरवला जाईल.